" मागासवर्गीय जनशक्ती पार्टी "- २००५
वार्षिक लेखा परिक्षण लेखे व आयकर विवरण सादर न केल्यामुळे या पक्षाची नोंदणी रद्द करण्याबाबत .

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

R.P.A.D.

क्रमांक-रापनों-२०१५/प्र.क्र.१/का.११,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ११.०८.२०१३

## आ दे श

राज्यामध्ये लोकशाहीचे बळकटीकरण व्हावे व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाद्वारे निवडणूक लढविण्यावर भर देण्यात यावा या उद्देशाने राज्य निवडणूक आयोगाने "महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्ह वाटप आदेश" २००४ व क्रमांक-एसईसी/२००९/सीआर-४९/का.११, दि. ३१/०३/२००९ आदेश पारित केले आहेत.

२. या अधिसूचनेनुसार "कोणतीही संस्था किंवा राजकीय पक्ष म्हणून स्वत:स म्हणवून घेणाऱ्या व्यक्तीची संस्था किंवा भारत निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच नोंदणी झालेला राजकीय पक्ष" राज्य निवडणूक आयोगाकडे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रयोजनाकरिता राजकीय पक्ष म्हणून नोंदणीसाठी अर्ज करु शकतो. सदर संस्था किंवा पक्ष यांनी सर्व बाबींची पूर्तता केल्यावर राज्य निवडणूक आयोगाकडून राजकीय पक्ष म्हणून त्यांची नोंदणी करण्यात येते.

३. या अधिसूचनेतील तरतुदीनुसार प्रत्येक नोंदणीकृत राजकीय पक्षाने "वार्षिक लेखा परिक्षण लेख्याची" एक प्रत व संबंधित कायद्यान्वये भरलेल्या "वार्षिक आयकर विवरणपत्राची" एक प्रत संबंधित वित्तीय वर्ष संपल्यानंतर एक वर्षाच्या आत आयोगाच्या कार्यालयास देण्याची तसेच आदर्श आचारसंहिता व आयोगाचे निर्देश व सूचनांचे पालन करण्याची तरतूद आहे. जर एखाद्या राजकीय पक्षाने आदर्श आचारसंहितेचे व आयोगाच्या सूचनांचे पालन केले नाही तर त्यांची नोंदणी रद्दबातल ठरवून त्यांना नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या यादीतून काढून टाकण्याचीदेखील तरतूद आहे.

४. "मागासवर्गीय जनशक्ती पार्टी" या पक्षाची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्रमांक-रानिआ/रापनों-२००५/प्र.क्र.१२/का.११, दि. ०६.०६.२००५ अन्वये करण्यात आलेली आहे. या नोंदणीकृत पक्षाने खाली दर्शविल्याप्रमाणे आवश्यक असलेले "वार्षिक लेखा परिक्षण लेख्याची" प्रत व "वार्षिक आयकर विवरणपत्राची" प्रत सादर केलेली नाही.

| वर्ष | प्राप्त न झालेली कागदपत्रे | |
|---|---|---|
| | लेखा परिक्षित लेख्याची प्रत | आयकर विवरणाची प्रत |
| २००५-२००६ | अप्राप्त | -- |
| २००६-२००७ | अप्राप्त | अप्राप्त |
| २००७-२००८ | अप्राप्त | अप्राप्त |
| २००८-२००९ | अप्राप्त | अप्राप्त |
| २००९-२०१० | अप्राप्त | अप्राप्त |
| २०१०-२०११ | अप्राप्त | अप्राप्त |
| २०११-२०१२ | अप्राप्त | अप्राप्त |
| २०१२-२०१३ | अप्राप्त | अप्राप्त |
| २०१३-२०१४ | अप्राप्त | अप्राप्त |
| **एकुण** | ९ | ८ |

५. "मागासवर्गीय जनशक्ती पार्टी" यांना खाली दर्शविल्याप्रमाणे एकूण चार पत्रांद्वारे सर्व प्रलंबित कागदपत्रे त्वरित सादर करण्याबाबत विनंती करून सदर कागदपत्रे सादर न केल्यास नियमाप्रमाणे निलंबनासह सर्व पुढील कार्यवाही करण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या होत्या.

(i) क्रमांक-रानिआ/रापनों-२०१०/प्र.क्र.१०/का.११, दि.१९/०७/२०१०
(ii) क्रमांक-रानिआ/रापनों-२०१०/प्र.क्र.१०/का.११, दि.१४/१२/२०१०
(iii) क्रमांक-रानिआ/रापनों-२०१०/प्र.क्र.१०/का.११, दि.०७/०१/२०११
(iv) क्रमांक-रानिआ/रापनों-२०११/प्र.क्र.६१/का.११, दि.२०/०९/२०११

२०३/५वि

६. वरील पत्राला कसलाही प्रतिसाद न मिळाल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाकडून सदर पक्षाला आदेश क्र.रापनों-२०१५/प्र.क्र.१/का.११, दि.०४/०६/२०१५ द्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे अंतिम नोटीस बजावण्यात आली :

*"या कागदपत्रांची पूर्तता आपणाकडून वरील मुदतीत न झाल्यास किंवा आपणाकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यास आपल्या पक्षाची नोंदणी रद्द करण्यात येईल."*

तसेच प्रमुख वर्तमानपत्रामध्ये या आशयाची जाहीर सूचनासुध्दा दि. १२.०६.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. "मागासवर्गीय जनशक्ती पार्टी" यांच्या कार्यालयाला पाठविलेली नोटीस बटवडा न होता, आयोगाच्या कार्यालयाला परत आली. तसेच सदर पक्षाने जाहीर सूचनेला कोणताही प्रतिसाद मुदतीत किंवा मुदत संपल्यानंतर दिलेला नाही.

७. ज्याअर्थी, "मागासवर्गीय जनशक्ती पार्टी" यांची राजकीय पक्ष म्हणून २००५ मध्ये नोंदणी झालेली होती व ज्याअर्थी या पक्षाने अधिसूचनेतील तरतुदीनुसार दरवर्षी आयोगाच्या कार्यालयास "वार्षिक लेखा परिक्षण लेख्याची" प्रत व "वार्षिक आयकर विवरणपत्राची" प्रत सादर केली नाही व ज्याअर्थी, या पक्षाला वारंवार विनंती करुनही व २०१५ मध्ये अंतिम नोटीस देऊनही त्यांनी कसलाही प्रतिसाद दिला नाही त्याअर्थी, सदर पक्षाची नोंदणी पुढे चालू ठेवण्याचे काहीही प्रयोजन दिसून येत नाही. म्हणून वरील सर्व बाबींचा विचार करुन "मागासवर्गीय जनशक्ती पार्टी" या पक्षाची राजकीय पक्ष म्हणून केलेली नोंदणी या आदेशाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( डॉ. प्रदीप व्यास )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

का १५

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
"मागासवर्गीय जनशक्ती पार्टी"
एन. एच. ६, देवरी, जिल्हा गोंदिया,
महाराष्ट्र - ४४१ ९०१

RPAD 4:55 p.m.